**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्त विभाग**
**प्रादेशिक बातमीपत्र**
**सकाळी 07 वाजून 10 मि**

**दिनांकः23.04.2025** **वारःबुधवार**

---

**ठळक बातम्या**

- जम्मू आणि काश्मीरमधल्या पहलगाम भागात झालेल्या दहशतवादी हल्ल्यात अनेक पर्यटकांचा मृत्यू; मृतांमध्ये महाराष्ट्रातल्या पर्यटकांचाही समावेश
- काश्मीर दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर सौदी अरेबियाचा दौरा आटोपता घेत पंतप्रधान नरेंद्र मोदी मायदेशी दाखल
- मत्स्य व्यवसायाला कृषीचा दर्जा द्यायला राज्य मंत्रिमंडळाची मान्यता

  आणि
- मराठी आणि इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये पहिली ते पाचवीसाठी हिंदी भाषा अनिवार्य ऐवजी ऐच्छिक करण्याची शिक्षण मंत्र्यांची घोषणा

**जम्मू काश्मीर दहशतवादी हल्ला**

जम्मू आणि काश्मीरमधल्या पहलगाम भागात काल दहशतवाद्यांनी केलेल्या गोळीबारात अनेक पर्यटकांचा मृत्यू झाला आहे. मृतांमध्ये नौदलाच्या अधिकाऱ्यासह 2 परदेशी पर्यटकांचा समावेश आहे. या हल्ल्यात 20 पर्यटक जखमी झाल्याचं वृत्तसंस्थेनं म्हटलं आहे. लष्कर ए तैयबा या दहशतवादी संघटनेच्या द रेझिस्टन्स फ्रंट या गटानं या हल्ल्याची जबाबदारी घेतली आहे. या भ्याड हल्ल्याच्या सूत्रधारांना पकडण्यासाठी सुरक्षा दलांनी आपली शोधमोहीम तीव्र केली आहे. केंद्रिय गृहमंत्री अमित शहा काल श्रीनगरला पोहोचले असून त्यांनी सुरक्षा दलांच्या वरीष्ठ अधिकाऱ्यांची उच्चस्तरीय बैठक घेतली. आज ते नायब राज्यपाल मनोज सिन्हा यांच्यासह घटनास्थळी भेट देणार आहेत. तसंच जखमींची विचारपूस करुन ते घटनेच्या साक्षीदारांसमवेत संवाद साधतील.राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी या हल्ल्याचा तीव्र शब्दात निषेध केला आहे. दरम्यान, या हल्ल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी आपला सौदी अरेबियाचा दौरा सोडून भारतात परतले आहेत. पंतप्रधानांनी या हल्ल्याचा तीव्र शब्दांत निषेध केला आहे. या हल्ल्याच्या सूत्रधारांवर कठोर कारवाई केली जाईल. दहशतवाद्यांचे दुष्ट मनसुबे कधीच सफल होणार नाहीत असं पंतप्रधानांनी समाज माध्यमावरील संदेशात म्हटलं आहे. पर्यटकांवर झालेल्या हल्ल्याचा निषेध करण्यासाठी काश्मीर खोऱ्यातल्या व्यावसायिकांनी तसंच पर्यटन कंपन्यांनी आज राज्यात बंद पुकारला आहे. काल स्थानिक नागरिकांनी या हल्ल्याच्या विरोधात निदर्शनं करण्यासाठी कँडल मार्च काढला होता. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही जम्मू काश्मीरमधल्या भ्याड हल्ल्याचा तीव्र शब्दांत निषेध केला मृतांच्या

कुटुंबियांप्रती शोकसंवेदना व्यक्त केल्या आहेत. प्राथमिक माहितीनुसार मृतांमध्ये महाराष्ट्रातल्या दोन पर्यटकांचा समावेश आहे. जम्मू काश्मीरच्या विभागीय आयुक्तांशी चर्चा केल्याची आणि तिथल्या प्रशासनाच्या आपण संपर्कात असल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी समाज माध्यमावरील संदेशातून दिली आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांनीही पर्यटकांवरचा हल्ला दुर्दैवी आणि धक्कादायक असल्याचं म्हणत त्याचा निषेध केला आहे. जम्मू काश्मीरमध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा जगभरातून निषेध होत आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दहशतवादाविरोधात लढण्यासाठी अमेरिका भारतासोबत असल्याचं म्हटलं आहे. रशिया, संयुक्त अरब अमीराती आणि इराण या देशांच्या नेत्यांनीही या घटनेचा निषेध केला आहे.

**राज्यमंत्री मंडळ निर्णय**

मत्स्यव्यवसायाला कृषी समकक्ष दर्जा देण्याचा निर्णय काल राज्य मंत्रीमंडळानं घेतला. राज्यातल्या मच्छिमार, मत्स्यसंवर्धक आणि मत्स्यकास्तकारांना कृषी क्षेत्राप्रमाणेच पायाभूत सुविधा आणि सवलती उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीनं हा निर्णय घेण्यात आला. कृषी दरानं वीजपुरवठा, किसान क्रेडिट कार्ड, बँक कर्ज सुविधा, अल्प दरात विमा संरक्षण तसंच सौर ऊर्जा योजनेचा लाभ यामुळे मत्स्यशेतकऱ्यांना मिळणार आहेत. सातारा जिल्ह्यातल्या नायगांव या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुलेंच्या जन्मगावी त्यांचं भव्य स्मारक आणि महिला प्रशिक्षण केंद्र उभारण्याचा निर्णयही राज्य मंत्रीमंडळानं काल घेतला. केंद्रीय कामगार संहितेच्या अनुषंगानं तयार करण्यात आलेल्या महाराष्ट्र वेतन संहिता नियम 2025 आणि महाराष्ट्र औद्योगिक संबंध संहिता नियम 2025 यांना मंत्रिमंडळानं काल झालेल्या बैठकीत मंजूरी दिली. या नियमांचा प्रस्ताव आता केंद्र सरकारकडे मान्यतेसाठी पाठवण्यात येईल. भंडारा जिल्ह्यातील गोसीखुर्द राष्ट्रीय प्रकल्पाच्या 25 हजार 972 कोटी रुपयांच्या खर्चाच्या तरतूदीलाही मान्यता देण्यात आली. राज्यातील सहा विभागीय आयुक्त कार्यालयं आणि जिल्हाधिकारी कार्यालयांतील कंत्राटी विधि अधिकाऱ्यांच्या मानधनात वाढ करण्यालाही काल मान्यता देण्यात आली.

**शिक्षणमंत्री**

राज्यातल्या पहिली ते पाचवीच्या मराठी आणि इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये हिंदी भाषा अनिवार्य नव्हे तर ऐच्छिक करण्याचा निर्णय राज्य सरकारनं घेतला आहे. यासंदर्भात तज्ज्ञांशी चर्चा करुन लवकरच शासन निर्णय जारी केला जाईल, अशी माहिती शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी काल मंत्रालयात झालेल्या वार्ताहर परिषदेत दिली. राष्ट्रीय शिक्षण धोरणात 3 भाषा धोरण सुचवलं आहे. त्यानुसार हा निर्णय घेतला आहे; पण यासाठी केंद्राची सक्ती नसल्याचं त्यांनी स्पष्ट केलं. सुकाणू समिती, तसंच राज्यभरातल्या शिक्षण तज्ञाशी चर्चा करुनच हा निर्णय घेतला होता, अशी माहिती राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेचे संचालक राहुल रेखावार यांनी दिली.

**यूपी एससी निकाल**

केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या गेल्या वर्षी झालेल्या नागरी सेवा परीक्षेचा अंतिम निकाल काल जाहीर झाला. देशभरातून एकंदर 1009 उमेदवार या परीक्षेत यशस्वी झाले आहेत. शक्ती दुबे हिनं या परीक्षेत देशात पहिला क्रमांक पटकावला तर हर्षिता गोयल दुसरी आली आहे. पुण्याच्या अर्चित डोंगरे यानं राज्यात प्रथम तर देशात तिसरा क्रमांक पटकावला. पहिल्या 5 यशस्वी उमेदवारांमध्ये 3 महिला आणि 2 पुरुष उमेदवार आहेत. राज्यातल्या 90 पेक्षा जास्त उमदेवारांनी यूपीएससी परीक्षेत घवघवीत यश मिळवलं आहे. शिवांश जगदाळे यानं देशात 26 वा क्रमांक मिळवला. शिवानी पांचाळ राज्यात मुलींमध्ये पहिली ठरली असून तिचा देशपातळीवर 53 वा क्रमांक आहे.

**वक्फ - रिजिजू**

गरीब मुस्लिमांच्या भल्यासाठीच वक्फ कायद्यात सुधारणा केल्याचा पुनरुच्चार केंद्रीय अल्पसंख्याक मंत्री किरेन रीजिजू यांनी केला. ते काल मुंबईत वार्ताहर परिषदेत बोलत होते. लवकरच वक्फ मालमत्तांची यादी प्रसिद्ध केली जाणार असून जगातली सर्वात मोठी वक्फ मालमत्ता देशात असल्याचं ते म्हणाले. वक्फ सुधारणा कायद्याच्या बाबतीत विरोधकांकडून अपप्रचार केला जात आहे. नागरिकांमध्ये जनजागृती करण्यासाठी, सत्य त्यांच्यापर्यंत पोहोचवण्यासाठी सरकार प्रयत्नशील असल्याचं ते म्हणाले. देशाच्या इतिहासात पहिल्यांदाच संयुक्त संसदीय समितीने केलेल्या 14 सुधारणा सरकारनं मान्य केल्या अशी माहिती या विधेयकाच्या चाचणीसाठी स्थापन केलेल्या संयुक्त संसदीय समितीचे अध्यक्ष जगदंबिका पाल यावेळी म्हणाले. राहुल गांधी यांनी या विधेयकावरच्या चर्चेत सहभाग घेतलाच नाही. त्यामुळं या सुधारणा असंवैधानिक आहे, असं ते कसं काय म्हणू शकतात, असा सवाल त्यांनी केला.

**राज्यपाल**

भारतीय शेतीला शाश्वत, आर्थिक लाभाच्या आणि भविष्यासाठी सक्षम व्यवसायात रूपांतरित करण्यामधे कृषी विद्यापीठांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे, असं प्रतिपादन राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांनी केलं. राहुरी इथल्या महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या 38 व्या पदवीप्रदान समारंभात ते काल बोलत होते. या कार्यक्रमाला विधानपरिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे, कृषी मंत्री ॲड. माणिकराव कोकाटे आणि अन्य मान्यवर उपस्थित होते.

**पाणी नियोजन एकनाथ शिंदे**

तीव्र उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर ग्रामीण तसंच शहरी भागातल्या लोकांना पिण्याच्या पाण्यासाठी वणवण करावी लागू नये यासाठी पुढचे दोन महिने पिण्याचं पाणी जपून वापरा असे निर्देश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले आहेत. शिंदे यांनी राज्यातल्या पाण्याच्या स्थितीबाबत सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, मुख्याधिकारी यांच्याशी दूरदृश्य प्रणालीद्वारे चर्चा केली, त्यावेळी ते बोलत होते.

**पक्षप्रवेश**

कॉंग्रेसचे माजी आमदार संग्राम थोपटे यांनी काल मुंबईत आपल्या कार्यकर्त्यांसह भारतीय जनता पक्षात प्रवेश केला.

**नखगळती**

बुलडाणा जिल्ह्यातल्या काही गावांमध्ये केस गळतीचे आणि त्यानंतर आता नख गळतीचे प्रकार वाढत आहेत. या पार्श्वभूमीवर केंद्रीय आयुष आरोग्य कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी काल मेहकर इथं वस्तुस्थितीचा आढावा घेतला. केंद्र सरकारच्या पथकाला या आजाराच्या मुळाशी जाऊन कार्य करण्याचे निर्देश त्यांनी यावेळी दिले.

**आयपीएल**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेच्या काल लखनौ इथे झालेल्या साखळी सामन्यात दिल्ली कॅपिटल संघाने लखनौ सुपर जायंट्स संघाचा 8 गडी राखून पराभव केला. प्रथम फलंदाजी करत लखनौ सुपर जायंट्स संघाने 6 गडी बाद 159 धावा केल्या. त्याला प्रत्युत्तर देत, दिल्ली कॅपिटल संघाने 2 गडी बाद 161 धावा फटकावत सामना जिंकला.

**पाऊस**

कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्यात काल विजा आणि वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस झाला. मिरज तालुक्यातील आरग इथं वीज पडून एकचा मृत्यु झाला. अनेक ठिकाणी झाडं उन्मळून पडली तसंच विद्युत पुरवठाही खंडित झाला होता. तर सोलापूर जिल्ह्यात काल तापमानाचा पारा 43 अंशांवर गेला आहे.

**हवामान**

येत्या 24 तसत राज्यातलं हवामान मुख्यतः कोरडं राहील, कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी उष्ण आणि दमट
वातावरण राहील, तर विदर्भात तुरळक ठिकाणी उष्णतेची लाट येईल, असा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.**